bookmyshow

**Publication:** Saamna
**Edition:** Mumbai
**Date:** April 24, 2019

## दिव्यांगांसाठी नृत्य कार्यशाळा

बुक माय शोची चॅरिटी ट्रस्ट 'बुक अ स्माइल' आणि शामक दावरची नॉन प्रॉफिट व्हिक्टरी आर्ट फाउंडेशन यांनी आंतरराष्ट्रीय नृत्य दिनानिमित्त दिव्यांग मुलांसाठी विशेष नृत्य कार्यशाळेचे आयोजन केले आहे. एनजीओतील ५०हून अधिक सहभागी नृत्याचा आनंद साजरा करणार आहेत. मुंबईतील पारसी कॉलनी, विलेपार्ले आणि माटुंगा या तीन एनजीओमध्ये याचे आयोजन केले आहे. नृत्याचा आनंद घेण्यासाठी कार्यशाळेने 'डान्स फॉर गुड' हे स्लोगन निवडले आहे.